# सोलापूर विद्यापीठ

सोलापूर पुणे महामार्ग, केगांव,
**सोलापूर** - ४१३ २५५ (महाराष्ट्र)
website: http://su.digitaluniversity.ac

# SOLAPUR UNIVERSITY

Solapur Pune National Highway, Kegaon,
**Solapur** - 413 255 (Maharashtra)
Phone/Fax : 0217-2744778/70
website:http://su.digitaluniversity.ac


जा.क्र.सोविसो/पात्रता/2013-14/3167 दि. 30 JUL 2013

प्रति,
मा.प्राचार्य,
सोलापूर विद्यापीठ संलग्नित अभियांत्रिकी,
औषधनिर्माणशास्त्र,एम.बी.ए.,एम.सी.ए महाविद्यालये,
सोलापूर.

**विषय :-** जात वैधता प्रमाणपत्र सादर न केलेल्या उमेदवारांचे निकाल जाहीर करण्याबाबत...
**संदर्भ :-** तंत्र शिक्षण संचालनालयाचे पत्र क्र.२अ/एडीएम/२०१२/१५३७ दि. १६ जूले २०१२

महोदय,

मा.प्र.संचालक तंत्र शिक्षण संचालनालय यांनी वरील संदर्भीय दि.१६/०७/२०१२ रोजीच्या पत्रान्वये जातवैधता प्रमाणपत्र सादर न केलेल्या विद्यार्थ्यांचे निकाल जाहीर करण्याबाबत सुचना दिलेल्या आहेत. सदर सुचनेनुसार चालु शैक्षणिक वर्षासाठी देखील कार्यवाही करण्यास मा.कुलगुरुंनी मान्यता दिलेली आहे. त्यानुसार आपल्या महाविद्यालयातील ज्या विद्यार्थ्यांनी जात पडताळणी प्रमाणपत्र सादर केलेले नाहीत अशा विद्यार्थ्यांकडून १००/- रु.चे स्टॅम्प पेपरवर हमीपत्र घेण्यात यावे. महाविद्यालयातील अशा प्रकारच्या सर्व विद्यार्थ्यांचे तीन महिन्यात जात पडताळणी प्रमाणपत्र सादर करण्यात येईल असे हमीपत्र एकत्रित करुन प्राचार्या मार्फत विद्यापीठ कार्यालयास सादर करावेत. या संदर्भात कोणत्याही विद्यार्थ्यास व्यक्तीशः विद्यापीठ कार्यालयात चौकशीसाठी पाठवू नये. सदर हमीपत्र प्राप्त झाल्यानंतर त्यांचा एकत्रितपणे निकाल जाहीर करण्यात येईल. सदर विद्यार्थ्यांचे प्रवेशाची तंत्र शिक्षण संचालनालय कडून पूर्तता करुन घेण्याची जबाबदारी संबंधीत महाविद्यालयाची राहील.

ज्या विद्यार्थ्यांचे जात पडताळणी प्रमाणपत्र प्राप्त झाले आहेत अशा विद्यार्थ्यांचे प्रमाणपत्र संबंधीत महाविद्यालयाच्या प्राचार्यांनी साक्षंकित करुन स्वतंत्ररित्या एकत्रितपणे विद्यापीठ कार्यालयास सादर करावेत. या विद्यार्थ्यांच्या प्रवेशातील त्रुटीबाबत दोन महिन्यात तंत्र शिक्षण संचालनालयाकडून त्रुटीची पूर्तता करुन घेण्यात येईल अशी महाविद्यालयांनी हमी देऊन पाठवावे.

कळावे.

आपला विश्वासु,

(शिवशरण माळी)
**कुलसचिव**